आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.००वाजता

१५ मे २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- लोक कल्याणाच्या योजना राबवताना केंद्र सरकारनं कुठल्याही धर्माला केंद्रस्थानी ठेवलं नव्हतं, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं नाशिकमध्ये प्रतिपादन
- पराभव समोर दिसत असल्यानं भाजपा वारंवार काँग्रेस, शरद पवार आणि उद्धव ठाकरेंचा उल्लेख करत असल्याचा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा दावा
- नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या अंतर्गत पहिल्यांदाच १४ जणांना नागरिकत्व प्रमाणपत्र प्रदान

**आणि**

- मुंबई महानगर क्षेत्रात उद्या उष्णतेची लाट येण्याची शक्यता, उर्वरित महाराष्ट्रात पावसाचा अंदाज

**<><><><><>**

केंद्र सरकारनं लोक कल्याणाच्या योजना राबवताना कुठल्याही धर्माला केंद्रस्थानी ठेवलं नव्हतं. पण काँग्रेस धर्माच्या आधारे आरक्षण देण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावा भाजपा नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नाशिक जिल्ह्यातल्या प्रचारसभेत केला. अर्थसंकल्पातली १५ टक्के तरतूद अल्पसंख्यांकांसाठी ठेवण्याचा काँग्रेसचा विचार होता. पण मुख्यमंत्री असताना याला विरोध केल्यानं काँग्रेसला ते करता आलं नाही, असा दावा त्यांनी यावेळी बोलताना केला.

शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावरही त्यांनी टीका केली. राम मंदिराच्या मुद्द्यावर काँग्रेस करत असलेल्या वक्तव्यांवर उद्धव ठाकरे काहीही मत व्यक्त करत नसल्याचा दावा त्यांनी केला. बाळासाहेबांची स्वप्न उद्धव ठाकरे यांनी नष्ट केल्याचा आरोप प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी बोलताना केला.

## होल्ड प्रधानमंत्री १

या निवडणुकीच्या चारही टप्प्यात इंडिया आघाडीला लोकांनी नाकारलं असल्याचं ते म्हणाले. केंद्रातलं सरकार शेतकरी विरोधी असल्याचा विरोधकांचा दावा खोडून काढत त्यांनी शेतकऱ्यांसाठी राबवलेल्या विविध योजनांची माहिती दिली. कांद्याची निर्यात बंदी हटवल्यानंतर मोठ्या प्रमाणात निर्यात सुरू झाली असून दहा दिवसातच 22 हजार क्विंटल कांद्याचे निर्यात झाल्यांचं त्यांनी सांगितलं. द्राक्षांना लवकरच क्लस्टर योजनेचा लाभ देण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

आपल्यासाठी शेतकऱ्यांचं हित सर्वोतोपरी आहे. आपलं सरकार पीएम किसान निधी योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दरवर्षी बारा हजार रुपये देतं. दहा वर्षांत काद्यांची निर्यात ३५ टक्क्यांनी वाढवली. तसंच कांद्याच्या आयात-निर्यातीवर अनुदानदेखील दिलं असंही मोदी यांनी सांगितलं.

कांद्यासंदर्भात शेतकरीच स्वयंपूर्ण होईल आणि सरकारच्या मदतीशिवाय उभा राहू शकेल यासाठी केंद्र सरकार स्वतंत्र यंत्रणा उभारत असल्याचं उपमुख्यंत्री देवेंद्र फडणवीस या सभेत म्हणाले. धान उत्पादक शेतकऱ्यांप्रमाणेच कांद्यालाही किमान आधारभूत मूल्य आणि प्रोत्साहनपर रक्कम देण्याची मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

देशात पहिल्यांदाच गरीबांकडे वैद्यकीय उपचारासाठी गॅरंटी कार्ड आलं आहे, पक्कं घर बांधलं जात आहे, प्रत्येक घरासाठी नळ योजना राबवली जात आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कल्याणमधल्या प्रचारसभेत सांगितलं. आपल्या सरकारच्या काळात २५ कोटी जनता गरीबी रेषेच्या वर आली आहे, असंही मोदी यावेळी म्हणाले. सरकार आल्यानंतर आपल्याकडे पहिल्या १२५ दिवसांचा आराखडा तयार आहे. यासाठी तरुणांनी सूचना लिहून पाठवाव्यात. त्या सूचनांचा समावेश आपण आपल्या आराखड्यात करू, असं आश्वासनही त्यांनी दिलं.

पहिल्या शंभर दिवसांत आपण विकासाचा पाया घालणार आहोत. जेणेकरून २०४७ च्या विकसित भारताचं ध्येय जवळ येईल, असंही मोदी यांनी सांगितलं.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह इतर अनेक नेते उपस्थित होते. थोड्याच वेळात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी घाटकोपरमध्ये रोड शो करणार आहेत.

**<><><><><>**

भाजपाला पराभव समोर दिसत असल्यानं ते वारंवार काँग्रेस, शरद पवार आणि उद्धव ठाकरेंचा उल्लेख करतात असा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आजच्या सभेत राम मंदिर आणि अल्पसंख्याक द्वेषावर भर देऊन लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, असा आरोप त्यांनी केला. काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर ते सातत्यानं बिनबुडाचे आरोप करत आहेत. आरक्षणाच्या मुद्द्यावरही मोदी यांनी काँग्रेसवर केलेले आरोप धादांत खोटे आहेत, असं ते म्हणाले. जाहिरातफलकाची दुर्घटना २ दिवसापूर्वीच झालेली असताना घाटकोपर परिसरातून रोड शो करुन भाजपा असंवेदनशीलता दाखवत असल्याचा दावा त्यांनी केला.

**<><><><><>**

मूठभर लोकांच्या हिताची जपणूक करणं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं सूत्र आहे अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज केली. राज्यातली कारखानदारी समृद्ध करण्याऐवजी कारखाने गुजरातमध्ये कसे जातील याची काळजी सत्ताधारी घेत आहेत. याचे दुष्परिणाम महाराष्ट्रावर होणार आहेत, असा इशारा त्यांनी कांजूरमार्ग इथल्या प्रचारसभेत बोलताना दिला. पुढची पिढी प्रगतीच्या रस्त्यावर जायला हवी असेल, तर आज भाजप तडीपार ही घोषणा प्रत्यक्षात आणायचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

रत्नागिरी - सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघात नुकत्याच झालेल्या निवडणूक प्रक्रियेदरम्यान भाजपचे उमेदवार नारायण राणे यांना मतदान करण्यासाठी पैसे वाटप झालं असल्याची तक्रार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार वैभव नाईक यांनी, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे केली आहे. या निवडणुकीत नारायण राणे यांनाच मतदान करण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रत्येक गावात मतदारांना पैसे वाटप झाल्याचं निदर्शनास आलं असल्याचं वैभव नाईक यांनी या तक्रारीत म्हटलं आहे.

**<><><><><>**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मुंबई उत्तर मध्यचे खर्च निरीक्षक सुरजकुमार गुप्ता यांच्यासह अधिकाऱ्यांनी पवईच्या जंगलात हातभट्टी तयार करण्यात येत असलेल्या ठिकाणांवर छापा टाकून ३४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून तो नष्ट केला.

**<><><><><>**

घाटकोपर मधल्या छेडानगर परिसरात जाहिरात फलक कोसळून दुर्घटना घडल्याच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेनं कडक कारवाईला सुरुवात केली आहे. या ठिकाणी महानगरपालिकेची परवानगी न घेता उभारण्यात आलेल्या अन्य तीन जाहिरात फलकांवर निष्कासन कारवाई युद्धपातळीवर सुरु आहे. वाऱ्याच्या वेगामुळे फलक उतरवण्याच्या कारवाईत बाधा येत आहे. दरम्यान , मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे हद्दीतील नियमबाह्य आकाराचे म्हणजे ४० फूट बाय ४० फूट पेक्षा अधिक आकाराचे सर्व जाहिरात फलक रेल्वे प्रशासनाने तातडीने हटवावेत, या आशयाची नोटीस बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने बजावली आहे.

या दुर्घटनेत १४ जणांचा मृत्यू ओढवला, तर ७४ जखमींना सुखरूपपणे बाहेर काढण्यात आले आहे. त्यापैकी ४२ जखमींवर महानगरपालिकेच्या विविध रूग्णालयांमध्ये उपचार सुरू असून ३२ जखमींवर उपचार करून त्यांना घरी

सोडण्यात  आले आहे. घटनास्थळी कोसळलेल्या फलकाच्या सुट्या भागांसह इतर सामान काढताना ज्वलनशील पदार्थांमुळं अडथळे येत आहेत.

<><><><><>

देशभर गाजलेल्या महादेव बेटिंग ॲप प्रकरणी पुण्यातील नारायणगावमध्ये पोलीसांनी धाड टाकून ७० जणांना अटक केली. परदेशासह देशातील इतर राज्यात धडी टाकल्या नंतर महादेव ऑनलाइन बेटिंग ॲपच काम पुण्याच्या नारायणगावामधून सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. या ऑनलाईन सट्टेबाजी ॲपच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांच हवाला त्यांनी केल्याचे अंमलबजावणी संचालयानलयाने केलेल्या तपासात उघड झाल आहे.

<><><><><>

CAA अर्थात नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या अंतर्गत आज पहिल्यांदा १४ जणांना नागरिकत्व प्रमाणपत्रांचं वाटप झालं. या कायद्याच्या अंतर्गत अर्ज केलेल्या या व्यक्तींना केंद्रीय गृहसचिव अजयकुमार भल्ला यांनी ही प्रमाणपत्र सुपूर्द केली. नागरिकत्वासाठी अर्ज केलेल्या इतरांना त्यांची प्रमाणपत्र ईमेलद्वारा पाठवण्यात आल्याचं केंद्रीय गृहमंत्रालयानं म्हटलं आहे. या अधिसूचनेनुसार ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी  पाकिस्तान,बांगलादेश किंवा अफगाणिस्तानातून  भारतात आलेल्या हिंदू, शीख, जैन, बौद्ध, पारसी आणि ख्रिश्चन धर्माच्या माणसांनी नागरिकत्वासाठी अर्ज करायचे होते.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुवाहाटी इथं राजस्थान रॉयल्सचा सामना पंजाब किंग्जशी होणार आहे. पंजाब किंग्ज संघ आधीच प्ले ऑफमधून बाहेर पडला आहे, तर राजस्थान रॉयल्सचं अव्वल चार संघात स्थान मिळवण्याचं लक्ष्य असेल. हा सामना गुवाहाटीमधे बार्सापारा स्टेडिअमवर थोड्याच वेळात म्हणजे संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

मुंबईसह कोकणात आज कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ  झाली.  विदर्भ आणि मराठवाड्यात मेघगर्जनेसह पावसानं काल हजेरी लावल्यानं कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत घट झाली. गडचिरोली आणि सोलापूर जिल्ह्यांत आज संध्याकाळी मेघगर्जना, वादळी वाऱ्यांसह  पावसानं हजेरी लावली.

मुंबई महानगर क्षेत्रात उद्या उष्णतेची लाट राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. उर्वरित महाराष्ट्रात मात्र पाऊस पडू शकतो. नाशिक आणि अहमदनगरमध्ये उद्या ऑरेंज अलर्ट दिला आहे. मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यांसह पाऊस आणि असून गारपीटीची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकण,मराठवाडा, विदर्भात ही तुरळक ठिकाणी सोसाट्याचे वारे आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**